तौफिक हारुण नायकवडे यांना वाणिज्य शाखेतून पीएचडी प्रदान

श्री व्यंकटेश महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील सहाय्यक प्राध्यापक श्री. तौफिक हारुण नायकवडे यांनी अत्यंत गरीब व हालाखीची परिस्थिती असताना देखील जिद्दीने उच्च शिक्षण घेत सेट, नेट परीक्षा उत्तीर्ण होऊन प्राध्यापक बनण्यासाठी ची पात्रता सिद्ध केली तसेच त्यांना शिवाजी विद्यापीठाची वाणिज्य विषयातून पीएचडी प्रदान करण्यात आली. 'अ स्टडी ऑफ मॅनेजमेंट प्रॅक्टिसेस ऑफ स्ट्रीट वेंडोर इन कोल्हापूर डिस्ट्रिक्ट' या विषयावर त्यांनी आपला पीएचडी प्रबंध शिवाजी विद्यापीठात सादर केला होता. सदर पीएचडी प्रबंध करण्यासाठी त्यांना श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे प्राचार्य व मार्गदर्शक डॉ. व्ही. ए. माने यांचे मार्गदर्शन लाभले.